अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शनिवार, दि. १० ऑगस्ट २०२४ । ▶ वर्ष : २२ वे ▶ अंक : ३१२ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## धारदार हत्याराने तरूणास मारहाण; दहा जणांविरुद्ध गुन्हा

**सोलापूर :** धक्का लागल्याच्या कारणावरून धारदार हत्याराने तरुणाच्या डाव्या हाताचे दंडावर मारून जखमी केल्याची घटना ४ ऑगस्ट रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास शनी मंदिर रेल्वे स्टेशन रोड येथे घडली.

याप्रकरणी हर्षल रामचंद्र गायकवाड (वय-२५, रा.तक्षशील नगर, कुमठा नाका सोलापूर) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.त्याच्या फिर्यादीवरून सनी बगाडे, सतीश बगाडे, किरण कसबे, रोहन गायकवाड, ज्ञानेश्वर कदम, ओम साबळे, केतन पाटोळे, आमीन पाटोळे, अक्षय देडे, अभिषेक साबळे (सर्व रा.सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. हर्षला हा त्याच्या मित्र सम्राटसोबत मिरवणूक बघण्यासाठी गेला होता. त्यावेळी सम्राट मस्के याचा संशयित आरोपी सतीश यास धक्का लागला. त्यावेळी वरील लोकांनी सम्राट मस्के याला धक्काबुक्की करून शिवीगाळ केली. हर्षल हा भांडण सोडविण्यासाठी गेले असता, सनी व सतीश यांनी धारधार हत्याराने त्याच्यावर वार केला. त्यानंतर सनी, सतीश, किरण यांनी लाथाबुक्यांनी छातीवर, पोटावर, मारहाण केली आणि ठार मारण्याची धमकी दिली, अशी फिर्याद दाखल आहे. या प्रकरणाचा तपास मपोसई. व्हट्टे या करीत आहेत.



# खुर्ची भक्कम



# ‘फिल्डिंग’मुळे घुसमट



# ‘गेम’ फसल्याने अस्वस्थ



# खदखद सतावतेय

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवरील पुस्तकाचा कार्यक्रम आणि शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरेंचा दिल्ली दौरा या दोन्हींमध्ये मुख्यमंत्रीपदाची चर्चा सर्वाधिक झाली. विधानसभा निवडणूक अवघ्या दोन महिन्यांवर आलेली असताना महाविकास आघाडी आणि महायुतीत मुख्यमंत्रीपद कळीचा मुद्दा ठरणार असल्याचे दिसते. तशी आगाही सत्ताधारी आणि विरोधकांच्या गोटात घडत असलेल्या घटनांवरुन मिळू लागली आहे.

राजकारणाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या अजित पवार आणि मुत्सद्दी देवेंद्र फडणवीसांना मागे टाकून मुख्यमंत्रीपदी विराजमान झालेल्या एकनाथ शिंदेंवरील पुस्तकाच्या प्रकाशनाचा कार्यक्रम बुधवारी मुंबईत झाला. या कार्यक्रमात झालेल्या भाषणांमधून अजित पवारांनी त्यांच्या मनातील खदखद बोलून दाखवली. शिंदे आणि फडणवीस यांना सीनियर असूनही मी मागे पडलो. ते दोघे माझ्यानंतर राजकारणात आले आणि मुख्यमंत्रीही झाले, अशा शब्दांत पवारांनी खदखद व्यक्त केली.

भाजपसोबत जाऊन मुख्यमंत्रीपद मिळणार याची कल्पना असती, तर संपूर्ण पक्ष भाजपसोबत आणला असता, असे म्हणत पवारांनी त्यांची महत्वाकांक्षा आणि मनात असलेली बोच बोलून दाखवली. अस्थिर वातावरणात शिंदेंपेक्षा आपल्या अनुभवांचा आणि क्षमतांचा भाजपला अधिक उपयोग होऊ शकतो, ही गोष्ट ठसवण्याचा प्रयत्न पवारांनी केला. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर महायुतीच्या पराभवासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित नियतकालिकांनी भाजपच्या अजित पवारांशी केलेल्या हातमिळणीला जबाबदार धरले. त्यामुळे पवारांच्या महायुतीमधील स्थानाबद्दल साशंकता आहे. एकनाथ शिंदे आणि भाजपच्या विचारधारेत समानता असल्याने त्यांच्याबद्दल तो मुद्दा येत नाही. त्यातच लोकसभेतील त्यांची कामगिरी भाजप आणि अजित पवार गटापेक्षा सरस आहे. त्यामुळे शिंदे यांचे आसन भक्कम असल्याचे सांगण्यात येते.

**दिल्लीश्वरांची खेळी... :** फडणवीसांना बाजूला सारुन शिंदे यांच्या माध्यमातून शरद पवारांशी संवाद वाढवण्याची खेळी दिल्लीतले भाजपचे खेळत आहेत. ही खेळी शिंदे यांची क्रेझ वाढवणारी आणि फडणवीसांचे महत्व कमी करणारी आहे. त्यातच फडणवीस दिल्लीला जाणार असल्याच्या चर्चाही सुरु झाल्या आहेत. त्यामुळे शिंदे हे मुख्यमंत्रीपदाबद्दलचा त्यांचा दावा भक्कम करत असल्याचे स्पष्ट संकेत गेल्या काही दिवसांतील घटनांवरुन मिळत आहेत.

**सोलापूर/विशेष प्रतिनिधी**

राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सत्ताधारी महायुती आणि प्रबळ विरोधी पक्ष असलेली महाविकास आघाडी यांच्याकडून याच महिन्यात म्हणजे स्वातंत्र्यदिन झाल्यानंतर प्रचाराचा नारळ फोडला जाणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बुधवारच्या पुस्तक प्रकाशनप्रसंगी महायुतीच्या नेत्यांमध्ये झालेली जुगलबंदी आणि उद्धव ठाकरे यांनी केलेला दिल्लीचा दौरा यातून एक मोठा अनुमान समोर आल्याने विधानसभेचे चक्रव्यूह काय असेल याविषयी राजकीय विचारवंत बुचकळ्यात पडले आहेत.एकंदरीत रणनीती पाहाता मुख्यमंत्री शिंदे यांचे मुख्यमंत्रीपदाचे आसन भक्कम असून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना थोपण्यासाठी भाजपच्याच दिल्लीतील नेत्यांनी फिल्डिंग लावल्याची चर्चा आहे तर दिल्लीचा दौरा फ्लॉप गेल्याने उद्धव ठाकरे चिंताग्रस्त असून यावेळेसही सीएम पदाला गवसणी घालण्याची संधीच दिसत नसल्याने अजित पवार हेही अस्वथ असल्याचे सांगण्यात येते.



**आता नमते नाही घेणार... :** विधानसभेच्या तोंडावर महाविकास आघाडीतील बार्गेनिंग पॉवर वाढवण्यासाठी उद्धव ठाकरेंनी दिल्ली दौरा केला. राहुल गांधींसह अनेक वरिष्ठ काँग्रेस नेत्यांची त्यांनी भेट घेतली. विधानसभेला अधिक जागा आणि मुख्यमंत्रीपदाचा चेहरा अशा दोन महत्वाच्या मागण्या घेऊन ठाकरे दिल्लीला गेले होते. पण या दौऱ्यातून त्यांच्या हाती काहीही लागले नसल्याचे स्पष्ट झाले आहे. लोकसभेला काँग्रेसने ठाकरेंसमोर नमते घेतले. त्यांचे सगळे हट्ट पुरवले. सांगलीसारखी पारंपारिक जागा सोडली. पण तरीही ठाकरेंना काँग्रेसपेक्षा कमी जागा मिळाल्या. महाविकास आघाडीत सर्वात कमी स्ट्राईक रेट ठाकरेसेनेचा राहिला. अनेक महत्वाच्या जागा त्यांच्या पक्षाने गमावल्या. या सगळ्याची आठवण काँग्रेस नेत्यांनी ठाकरेंना दिल्ली दौऱ्यात करुन दिल्याचे सांगण्यात येते. काँग्रेसचे दिल्ली आणि राज्यातील नेते आता ठाकरेंसमोर नमते घेण्याच्या तयारीत नाहीत.

**डाळ नाही शिजली :** उद्धव ठाकरेंना महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा घोषित करण्याची मागणी ठाकरेसेनेकडून केली जात आहे. हा मुद्दा उद्धव ठाकरेंनी काँग्रेस नेत्यांच्या बैठकीत मांडला. पण त्यांची मागणी मान्य झाली नाही. भाजपचे नेते ठाकरे कुटुंबावर सातत्याने आरोप करत आहेत. तुम्हाला मुख्यमंत्रीपदाचा चेहरा म्हणून जाहीर केल्यास भाजपच्या हाती आयते कोलीत मिळेल. निवडणूक व्यक्ती केंद्रीत होईल. त्याचा फटका महाविकास आघाडीला बसेल, असे काँग्रेसकडून ठाकरेंना सांगण्यात आल्याची चर्चा आहे.दिल्ली दौऱ्यात ठाकरेंची डाळ शिजली नाही.बॅकफूटवर गेलेले ठाकरेंचे आगामी पाऊल काय असेल,याविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे.

**चुकांचा पाढा वाचला :** जागावाटपात अधिक जागांसाठी आग्रह धरणाऱ्या ठाकरेंना काँग्रेसच्या नेत्यांनी लोकसभेतील चुकांची आठवण करुन दिली. ठाकरेंच्या हट्टामुळे काँग्रेसनं सांगलीची जागा सोडली. पण तिथे काँग्रेसचा बंडखोर निवडून आला. तर ठाकरेंचा उमेदवार तिसऱ्या क्रमांकावर फ `कला गेला. रायगड, रत्नागिरी–सिंधुदुर्ग, हातकणंगले, संभाजीनगरसारख्या जागांवर शिवसेना कमी पडली. अनेक ठिकाणी उमेदवारांची निवड योग्य नव्हती, अशा चुकांचा पाढाच काँग्रेसच्या नेत्यांनी वाचल्याचं कळतं.

## गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

**सोलापूर :** अज्ञात कारणावरून राहत्या घरात गळफास घेऊन एकाने आपली जीवन यात्रा संपवली. ही घटना शुक्रवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास साखरपेठेत घडली. अरुण राजशेकर मिठ्ठा (वय-३२,रा. साखरपेठ,कन्ना चौक, सोलापूर) असे त्या तरुणाचे नाव आहे.अशोक चौकात त्याचे सोनाराचे दुकान आहे.शुक्रवारी दुपारी घरी आल्यानंतर त्याने गळफास घेतला.नातेवाईकांनी या घटनेची माहिती जेलरोड पोलीसांना सांगितली.त्यावेळी जेलरोड पोलीस ठाण्याचे पोलीस हेड कॉन्स्टेबल सय्यद यांनी त्यास उपचाराकरिता सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते.परंतु उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय सूत्राने सांगितले. या घटनेची प्राथमिक नोंद सिव्हिल पोलीस चौकीत ही झाली आहे.सिव्हिल हॉस्पिटल येथे मिठ्ठाच्या नातेवाईक व मित्र मंडळीने एकच गर्दी केली होती. अरुण याने नेमक्या कोणत्या कारणामुळे आत्महत्या केली याचा जेलरोड पोलीस तपास घेत आहेत.

## बेपत्ता नोंद असलेल्या वयस्कर महिलेची हत्या

- स्मशानभूमीतून महिलेचे प्रेत उकरून काढले
- अनेक प्रश्नांची उत्तरे गुलदस्त्यात

**सोलापूर/प्रतिनिधी**

एखाद्या रहस्य कथेला साजेसा तपास करीत सोलापूर शहर पोलिसांनी बेपत्ता नोंद असलेल्या वयस्कर महिलेची हत्या करणाऱ्या एका आरोपीला गजाआड केले.

भाजी विक्रीचा व्यवसाय करणारी एक महिला पंधरा दिवसांपासून बेपत्ता असल्यांची नोंद पोलीस आयुक्तालयाकडे आहे. तिच्याकडील दागिन्यांची चोरी करून तिची हत्या करून मृतदेहाची विल्हेवाट लावण्यात आल्याचे निष्पन्न झाले होते. संबंधित पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी तिच्या शोधासाठी संशयित आरोपीसह शुक्रवारी दुपारी स्मशानभूमी गाठली. जिथं तिचं शव पुरलं होतं, ती जागा संशयितानं पोलिसांना दाखवली, ती जागा उकरून तिचे प्रेत बाहेर काढण्यात आले. संशयिताचं जनमाणसांतील ओळख ’बंदुके’ अशी असून या गुन्ह्यामागे अन्य आरोपी असावेत, असा पोलिसांचा संशय आहे.



### पोलीस लवकरच घटना उघड करणार

या संदर्भात पोलिसांकडे संपर्क केला असता,त्यांनी तपास चालू असल्याची माहिती दिली. लवकरच आम्ही आपल्याला या घटनेबाबत सांगू, असेही सांगितले. या घटनेच्या अनुषंगाने त्या स्मशानभूमी परिसरात पोलिसांची वाहने व पोलीस अधिकाऱ्यांची गर्दी होती.

## अरण तीर्थक्षेत्र विकास आराखडा पुढील आठवड्यात शासन दरबारी

### जिल्हाधिकाऱ्यांसमवेत ट्रस्टचे पदाधिकारी, अधिकारी यांची बैठक

**माढा/प्रतिनिधी**

श्री संत शिरोमणी सावता महाराजांच्या अरण तीर्थक्षेत्राचा विकास आराखडा तयार करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून पुढील आठवड्यात हा आराखडा शासन दरबारी पाठवणार असल्याचे आश्वासन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी शिष्टमंडळाला दिले.

श्री संत शिरोमणी सावता महाराजांच्या अरण तीर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करण्यासंदर्भात संत सावता महाराज चॅरिटेबल ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांसह जिल्हाधिकारी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्याची बैठक शुक्रवारी सोलापुरात झाली. यावेळी जिल्हाधिकारी यांनी विकास आखाड्या बाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी संतसावता महाराजांचे वंशज ह.भ.प. सावता महाराज वसेकर, ह.भ.प रविकांत महाराज वसेकर ,ह भ प साखरचंद महाराज लोखंडे, ह भ प प्रभू महाराज माळी आदी उपस्थित होते.

४ ऑगस्ट रोजी संत शिरोमणी सावता महाराजांच्या अरण तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना छगनराव भुजबळ आणि इतर मागास बहुजन विकास मंत्री अतुल सावे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत संत शिरोमणी सावता महाराजांच्या वास्तुशिल्पासह भक्त निवासाचे भूमिपूजन झाले होते. यावेळी ’अ’ तीर्थक्षेत्र दर्जा आणि १०० कोटी रूपयांची तरतूद करण्याचे फडणवीस यांनी जाहीर केले होते.

या अनुषंगाने तिन्ही मंत्री महोदयांनी दूरध्वनीवरून जिल्हाधिकारी यांना तात्काळ विकास आराखडा तयार करण्यास सांगितले असून त्याची कार्यवाही गतीने सुरू असल्याचे जिल्हाधिकारी यांच्याकडून शिष्टमंडळाला सांगण्यात आले.



माढा : संत सावता महाराज चॅरिटेबल ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची भेट घेऊन निवेदन दिलेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




खूप थकलोय!

| | |
|---|---|
| कल्याण | 330-64-239 |
| मुंबई | 780-52-679 |

